शनिवार दि. **२०/०१/२०२४** रोजी शिबिराचे समारोप करण्यात आले. दि. २० जानेवारी ला या शिबीराचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या अध्यक्षतेखाली क.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष शांतारामजी बुटे, करुणाताई बुटे, क.शि.प्र. संस्थेचे सचिव मा. तुळशीरामजी तराळे साहेब, प्रा. राम चव्हाण व डॉ..सुधिर कोहचाळे, सरपंच वैभव तराळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शैलेश जयस्वाल व डॉ. कविता हेडा हे देखील उपस्थित होते. विशेष शिबिर ग्राम आपोती (बु.) या आठ दिवसीय शिबिराचा विस्तृत अहवाल कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश जयस्वाल यांनी प्रस्तुत केला. समारोपीय कार्यक्रम हा विशेषतः विद्यार्थ्यांचे मनोगत आणि सत्काराचा असतो म्हणून या ठिकाणी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुलींची गटप्रमुख कु मृण्मयी बोबडे व मुलांची गटप्रमुख श्री. सुमित वानखडे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. क.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष शांतारामजी बुटे यांनी आपल्या मनोगतातून रासेयो स्वयंसेवक कसा असावा तसेच रासेयो मधून विद्यार्थी घडण्याची धडा उपस्थितांना दिला. अध्यक्षीय भाषणात म. प्राचार्य यांनी जीवन घडविण्यात रासेयोचे विशेष योगदान आहे असे सांगितले. मा. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या श्रमदानातून बनवलेल्या पाणी अडवून बंधारा तयार केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. तसेच आठ दिवसीय शिबिरामुळे विद्यार्थी घडतो, सहजीवन, सहभोजन, लोकसेवेची जाणीव या सर्व गोष्टी शिकतो, असे सांगितले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश जयस्वाल व डॉ. कविता हेडा ह्यांचे सत्कार, मा. डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी शाल,श्रीफळ व रोपटे देऊन केले, या कार्यक्रमाचे संचलन डॉ. कविता हेडा यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. शैलेश जयस्वाल यानी केले.

या शिबीरात दररोज सकाळच्या सत्रामध्ये प्रार्थना, स्वच्छता प्रभातफेरी, वृक्षारोपण, श्रमदान घेण्यात आले. या मध्ये शिबीरार्थींनी लोणार या नदीवर वनराई बंधारा बांधला. तसेच गावातील बस स्टॅन्ड जवळ वृक्षारोपण केले.

# छायाचित्रे

**श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाचे सत्र २०२३-२४ चे विशेष शिबीर आपोती बुद्रुक येथे संपन्न झाले त्याचे काही ठराविक छायाचित्रे.**

**दिनांक १४/०१/२०२४**







**विशेष शिबिरासाठी मार्गदर्शन करताना माननिय प्राचार्य डॉ व्ही डी नानोटी सर.**







**विशेष शिबिराचे उद्घाटना व प्रतिमापूजन करतांना माननिय प्राचार्य डॉ व्ही डी नानोटी सर व इतर मान्यवर.**




**विशेष शिबिराचे उद्घाटना प्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर .**




**उद्घाटना प्रसंगी श्री वैभव तराळे सरपंच आपोती बुद्रुक**




उद्घाटना प्रसंगी मार्गदर्शन करतांना क्षेत्रिय समन्वयक डॉ कोहचाळे सर .




विशेष शिबिराचे उद्घाटना प्रसंगी स्वयंसेवक .

**दिनांक १५/०१/२०२४**







सकाळी प्रार्थना करतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक .







विशेष शिबिरादरम्यान व्यायाम करतांना स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी .





विशेष शिबिरादरम्यान शाळा परिसर स्वच्छ करतांना .







विशेष शिबिरादरम्यान प्रभात फेरी मध्ये सहभागी स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी .






डॉ स्वप्ना लांडे मॅडम ह्यांची अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैद्यानिक दृष्टिकोन वर कार्यशाळा .




रा. से . यो . व व्यक्तिमत्व विकास ह्या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. डॉ. विवेक हिवरे .




विशेष शिबिरादरम्यान विद्यार्थी जीवनात जगण्याची कला वर मार्गदर्शन करताना मा डॉ अजय उपाध्याय .




जागतिक मंदी , रुपया विरुद्ध डॉलर by मा. श्री. व्ही एल रुईवाले .




कार्यक्रमाचा आस्वाद घेतांना गावकरी मंडळी

दिनांक १६/०१/२०२४






सकाळी प्रार्थना करतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक .







शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य ह्यावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. महेश डाबरे .

महिला मेळावा







कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन by श्री. प्रसन्नजी रत्नपारखी व मधू कोठारी







बालविवाह मुक्त भारत ची शपथ घेताना स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी.







**महिला मेळावा अंतर्गत डॉ. पुनम अग्रवाल मॅडम ह्यांनी हर्बल प्रॉडक्ट्स कसे बनवायचे ह्यावर मार्गदर्शन केले**

**दिनांक १७/०१/२०२४**







**शारीरिक सास्थ्य व व्यायाम ह्यावर मार्गदर्शन करताना डॉ. राजेश चंद्रवंशी .**




**समाज माध्यमे , समाज आणि आजचा युवक ह्या विषयावर चर्चा करतांना डॉ. हरीश मालपाणी.**




**अग्निविर योजना - सन्य भरती मार्गदर्शन by डॉ. रोहित अग्रवाल .**





शालेय विद्यार्थ्यांसाठी व गावकरी ह्यांच्यासाठी रक्तगट तपासणी शिबीर सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे घेण्यात आले.




कायदेविषयक मार्गदर्शन करतांना मा. श्री. मोतीसिहजी मोहता सर.




कायदेविषयक मार्गदर्शन ह्या कार्यक्रमाला उपस्थित गावकरी मंडळी .





मा. श्री. मोतीसिहजी मोहता सर व इतर ,मंडळी  गावकऱ्यांशी चर्चा करतांना .

दिनांक १८/०१/२०२४











विशेष  शिबीर आपोती बुद्रुक येथेए ई. व्ही. एम. व व्ही. व्ही. पॅड. बाबत जनजागृती करतांना.






श्रमदानातून बंधारा साकारताना






श्रमदानातून बंधारा साकारताना






श्रमदानातून बंधारा साकारताना







सायबर सिक्युरिटी आणी यूथ सेफ्टी वर मार्गदशन करतांना प्रा. राम घायाळकर .





सांस्कृतिक कार्यक्रमाला जमलेले गावकरी मंडळी. | हरीपाठ करतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक.





विविध वेशभूषा साकारतांना आपोती बुद्रुकयेथील विद्यार्थी मित्र .





वेशभूषा स्पर्धेचे बक्षीस वितरण करतांना आपोती बुद्रुक येथील जेष्ठ नागरिक.





रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण करतांना आपोती बुद्रुक येथील जेष्ठ नागरिक.

दिनांक १९/०१/२०२४







दत्तक ग्राम आपोती बुद्रुक येथे गाव स्वच्छता करतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक








वृक्षारोपण करतांना स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी .




वृक्षारोपण करतांना स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी .







आपत्तीं व्यवस्थापन -प्रथमोपचार व सी. पी. आर. सांगताना डॉ.  मडावी व प्रा. zayte .

दिनांक २०/०१/२०२४







सकाळी प्रार्थना  व साफसफाई करतांना कार्यक्रम अधिकारी  व स्वयंसेवक.







श्रमदान व शालेय परिसर स्वच्छता करतांना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक.




आयुष्याची ताळेबंदी ह्या विषयावर मार्गदर्शन करतांना क्षेत्रिय समन्वयक डॉ कोहचाळे सर .




समारोपिय कार्यक्रमात सौ करुणाताई शांताराम बुटे ह्यांचे स्वागत करताना .







समारोपिय कार्यक्रमात कार्यक्रम अधिकारी ह्यांचा सत्कार करतांना माननिय प्राचार्य डॉ व्ही डी नानोटी सर .




समारोपिय कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना माननिय प्राचार्य डॉ व्ही डी नानोटी सर .




समारोपिय कार्यक्रमात माननिय प्राचार्य डॉ व्ही डी नानोटी सर, डॉ शांताराम बुटे सर , कार्यक्रम अधिकारी, व स्वयंसेवक .



भाराहुन जाणारा शेवटचा क्षण गावकरी विद्यार्थी मित्रां सोबत.

PAGE No. ______
DATE ______

संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ अमरावती

"सुवर्ण महोत्सवी वर्ष"

श्री. श. ल. तो विज्ञान महाविद्यालय, अकोला
रा. से. यो विशेष शिबिर
2023-24

# अभिप्राय पुस्तिका

PAGE No. ______

DATE ______

श.क.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या आपोती या गावात विशेष शिबिरात भेट देण्याचा व मार्गदर्शन करण्याचा योग आला. प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेले शिबिर अतिशय शिस्तबद्ध असल्याचे जाणवले. विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व आतिथ्य अतिशय आवडले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. शैलेश जयस्वाल व प्रा. डॉ. कविता हेडा यांनी उत्कृष्ट आयोजन केले. त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद व उर्वरित दिवसासाठी शुभेच्छा.

धन्यवाद

दि. 15.01.2024

प्रा. डॉ. विवेक हिवरे

॥ ॐ ॥

आज N.S.S कैम्प में आने का
योग बना एवं सुंदर उत्कृष्ट आयोजन हुआ
सभी विद्यार्थियों ने इसके से पुनः आनंदित
हुये आशा करते हैं भविष्य में समाज, व्यक्ति,
परिवार में अनुकूल परिवर्तन करेंगे।
भारत को पुनः जगद्गुरु बनाने में सभी
विद्यार्थियों की विशेष भूमिका हो।
सभी के उज्ज्वल भविष्य की
मंगल कामना है — 15/1/24
डॉ. अजय [illegible]
9881486137

Students चा Response चांगला आहे.
विषयानुसार आवड निर्माण झाली असे
विद्यार्थी सांगतात

N L Phulwade
7972936275

आज राष्ट्रीय सेवांतर्गत 'जादूटोणा विरोधी कायदा' मांडताना विशेष आनंद वाटला. गावकरी तर मोठ्या संख्येने उपस्थित होतेच, पण ज्या मुलांमध्ये खऱ्या अर्थाने वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवायचा आहे, ती शाळकरी मुले मोठ्या संख्येने उपस्थित होती. उत्स्फूर्त प्रतिसाद देत होती.

आपले मनापासून धन्यवाद.

डॉ. स्वप्ना लांडे
15/01/24

PAGE No.
DATE

~~The NSS camp organised~~ was ~~be~~

The NSS camp was well organised. and the arrangement was all so well. My best wishesh to Programm offier and student of NSS. Thank you.

---

Agrawal

Lt. Dr. R.M. Agrawal

17-01-24

आज आपल्या महाविद्यालयाच्या NSS camp ला सदिच्छा भेट दिली फार छान वाटले. ~~डॉ. देशा~~ डॉ. देशा मॅडम व डॉ. जमदाडे सर यांच्या मार्गदर्शनाने camp उत्तम रीत्या पार पडत आहे.

मनःपूर्वक शुभेच्छा!

सही

डॉ. आर. एन. [illegible]

IQAC.

—

आज दिनांक. 17-01-24 ला श्री [illegible] विज्ञान महाविद्यालय, [illegible] येथे भेट दिली. आपल्या महाविद्यालयाच्या NSS camp ला भेट देऊन खूप आनंद झाला. अतिशय [illegible] मेहनत घेत आहेत NSS चे विद्यार्थी [illegible] NSS कार्यक्रम अधिकारी डॉ. [illegible] [illegible] महिला अधिकारी डॉ. [illegible] [illegible] [illegible] [illegible] संपूर्ण NSS Team ला माझ्या शुभेच्छा!

धन्यवाद.

[signature] Ubale

Gangesh R. Ubale.

दि: 16-1-2024.

अभिप्राय

विषय :- डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य

वक्ता :- मा. प्रा. महेश डाबरे

आज दि. 16/01/2024 ला श्री रा.ल.त. विज्ञान महाविद्यालय, अकोलाच्या विद्यार्थ्यांशी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य या विषयावर हितगुज करतांना त्यांना भाऊसाहेबांच्या जीवनातील अनेक प्रश्न विचारले असता विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांमधील शिस्त वाखाणण्यासारखी आहे. शिक्षणाच्या वाटचालीसाठी हार्दिक - हार्दिक शुभेच्छा.

16/01/2024

[प्रा. महेश चं. डाबरे]

श्रीमती एल.आर.टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोला

PAGE No.

DATE

16-1-2024

विषय :- कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन

नाव :- श्री. प्रसन्नजी रत्नपारखी
प्रकल्प अधिकारी अकोला

आज 16/01/24 रोजी उद्योजकता या विषयावर खूप चांगल्या प्रकारे संभाषण केले व विद्यार्थीनी शांत प्रकारे सर्व ऐकले आहे व अतिशय उत्कृष्ट प्रकारे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा

(signature)

(प्रसन्न रत्नपारखी)
16/1/24

PAGE No.
DATE

आज दिनांक 16.01.24 रोजी रालतो (RLT) विज्ञान महाविद्यालय च्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या विशेष शिबिरात 'बालविवाह, बालतस्करी, बाल लैंगिक शोषण या विषयावर बोलण्याची संधि दिली त्याबद्दल आयोजक समितीचे, शिक्षकांचे विशेष धन्यवाद देतो.

NSS कॅम्प मध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी अतिशय शांततेने, आमचे म्हणणे ऐकून घेतले तसेच आजूबाजूच्या व्यक्तींना, मित्रांना सदर विषयावर सविस्तर समजावून सांगू याबद्दल प्रोत्साहन दिले.

सदर कॅम्प चे नियोजन पाहुन खुप आनंद झाला तसेच शिक्षकांनी आमचा सत्कार केला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

Rahul (signature)

राहूल अउरखे
Community Social Worker
ISWS Akola
Kailas satyarthi children foundation, New Delhi

(signature)
प्रतिक्षा सोनोने
Community Social Worker
ISWS, Akola

DATE

16/01/24

विषय: कौशल्य विकास व उद्योजकता मार्गदर्शन.

वक्ता: मधु कोठारी (फॅशन डिसायनर)

आपल्या मधली कला ला कौशल्य बनवा.

Train yourself to Become entrepreneur..

PAGE No.
DATE 17/01/2024

# अभिप्राय.

17-1-24

विषय :- शारिरीक स्वास्थ्य व व्यायाम.

नाव :- डॉ. शैलेश चंद्रवंशी

आज दि. 17/01/2024 रोजी कॅम्पला भेट दिली असता, शिस्त, अनुशासन व नियोजन समन्वयाने आढळून आली. आपण या माध्यमातून करित असलेले सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे.

आपण सर्वांना यशस्वीकरिता शुभेच्छा व अभिनंदन

17/01/24

PAGE No. ____
DATE ____

17/01/24

विषय: अग्निवीर योजना - सैन्य भरती मार्गदर्शन
वक्ता: ले. डॉ. रोहित अग्रवाल.

17/01/2024

आज रा.से.यो. च्या निवासी शिबीरास भेट देऊन खुप आनंद झाला दोन्ही कार्यक्रम अधिकारी आणि समस्त विद्यार्थ्यांना खुप खुप शुभेच्छा

(सही) मालपाणी

17-1-24

विषय :- कायदेविषयक मार्गदर्शन

नाव :- मा. ॲड. श्री. मोतीसिंहजी मोहता.

श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय अकोला तर्फे राष्ट्रीय सेवा योजने तर्फे विशेष शिबीरा प्रसंगी उपस्थित राहण्याचा सन्मान प्राप्त झाला.

आज १७.१.२०२४ रोजी श्री नथमल गोयनका विधी महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व सन्माननीय प्राध्यापक वृंद सुद्धा सोबत होते.

शिबीरार्थी विद्यार्थी, व विद्यार्थीनी तसेच गावकरी मंडळींना विविध कायद्याची माहीती [illegible] निमित्ताने उपलब्ध करुन दिली.

शिबीरार्थींची शिस्त व कार्य उत्कृष्ट होते. त्यांच्या मध्ये खुप उत्साह दिसुन आला.

सर्व शिबीरार्थी विद्यार्थी व विद्यार्थीनींना त्यांच्या भावी जिवना साठी खुप खुप शुभेच्छा

मोतीसिंह मोहता
अध्यक्ष
१७.१.२०२४
बुधवार

PAGE No. ____
DATE ____

१८/०९/२०२४

विषय: मतदार जनजागृती कार्यशाळा

वक्ता: ~~प्रा. अरुण~~ मनोज विश्वनाथ बोपटे.

RIT कॉलेज इस्लामपूर यांनी आयसोलेट आपटीडर विद्यालय येथे N.S.S. च्या कॅम्प चे आयोजन केले होते त्यांनी दिनांक १३ जानेवारी पासून या परिसरात अति. सुंदर नियोजनपूर्ण कार्यक्रम श्रमदान तसेच मतदान जनजागृती कार्यक्रमात सहभागी होऊन मतदान प्रक्रिया समजावून घेतली तसेच सर्व कॉलेजचे प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी उत्पन्न उत्साहपूर्ण वातावरणात या कार्यक्रमात भाग घेऊन सहकार्य केले याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे आपणास पुढील कार्यासाठी शुभेच्छा।

[illegible] आपला विश्वासू

विशाल आपटी

म. वि. बोपटे
सचिव (नि) दुग्धव्यवसाय
तथा विस्तार अधिकारी
प. स. वाळवा

PAGE No.
DATE

१८-८-२०२४

विषय :- सायबर सिक्युरिटी आणि युथ सेफ्टी.
नाव :- प्रा. राम घायलकर.

अतिशय नियोजीत व सुव्यवस्थीतपणे NSS camp organized केला विद्यार्थी तसेच Beg officer are takeng effort to success the camp.

All students are very discipline and egarly aquring ~~kno~~ new knowledge

so overall very nice experience

Thank You

(signature)

(Prf R B Ghaylkar)

PAGE No.
DATE

18-Jan 2024

कार्यक्रम- मतदार जनजागृती कार्यशाळा
वक्ते - श्री अरुण भा. खेडकर

N.S.S. Team of Shri R.L.T. College of science is doing extremely fantastic job, volunteers are hardworking sincere, honest & disciplined. & more importantly dedicated. programme-officers Dr. Jaiswal sir & Dr. Heda madam are taking utmost care of each & every Thing.

My experience of this visit is excellent.

ArunBKhedkar
18 Jan 2024
mr. A.B. Khedkar
Asst prof in English
Shri R.L.T. College of Sci
Akola

29/01/24

PAGE No.
DATE

विषय :- आपत्ती व्यवस्थापन
वक्ता :- 1) शैलेन्द्र मडावी सर
2) संकेश झायटे सर.
विषय :- आपत्ती व्यवस्थापन - सी.पी.आर.

~~वक्ता~~ :- DMC conducted training session in NSS camp of Shri. R.L.T. college of science, Akola. All the students are actively participating in all the activities. participation of villager's is more as I have seen old to youngsters to childrens are taking benefits from camp. All the arrangement about food & accomodation is very nice. I wish you all the best for the camp.

Mr. S. C. Zyate
Asst. Professor
Shri. R.L.T. college
Akola

20/01/23

PAGE No.
DATE

विषय : आयुष्याची ताळेबंदी.
वक्ता : मा. डॉ. सुधीर कोहचाळे.

आज दि. 20/01/2024 रोजी श्री. शि. ल. ना. विज्ञान महाविद्यालय अकोला चे विशेष शिबीर ग्राम- आपोती (बु.) येथे सदिच्छा भेट तसेच आयुष्याची ताळेबंदी या विषयावर विद्यार्थ्यांसोबत हितगुज करण्याचा योग आला. विद्यार्थी अत्यंत शिस्तप्रिय होते. या शिबीरात अंधश्रद्धा निर्मुलन, आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण जनजागृती, बेटी बचाओ बेटी पढाओ, असे स्तुत्य उपक्रम घेण्यात आले. अभिनव उपक्रमात बंधारा निर्मिती करण्यात आली. या विविध उपक्रमाचा गावकरी व विद्यार्थी यांना लाभ झाला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय नानोटी, कार्यक्रम अधिकारी डॉ शैलेश जयस्वाल, डॉ कविता हेडा यांचे हार्दीक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

दि. 20.01.2024
स्थान - आपोती. (बु.)

R Kohchale

डॉ. सुधिर आर. कोहचाळे
क्षे. समन्वयक, रासेयो
सं. गा. बा. अ. वि. अमरावती
(अकोला जिल्हा)

# वृत्तपत्र कात्रणे

# श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या श्रम संस्कार विशेष शिबिराचे उद्घाटन

पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी



**अकोला, दि.१८ :** श्री रालतो विज्ञान महाविद्यालय अकोला याच्या विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन समारंभ ग्राम आपोती (बु) येथे पार पडले. या उद्घाटनाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय नानोटी हे होते तर उद्घाटक दामोदर कडू उपाध्यक्ष कर्मवीर बाबासाहेब अपोटिकर विद्यालय आपातापा हे लाभले होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून ग्राम मारोली चे सरपंच वाघमारे, ग्राम आपौती येथील उपसरपंच राहुल शिरसाट, पोलिस पाटील मिलिंद मोहोळ, दीलीपजी बोडखे उपसरपंच मारोळी, उज्वल कुमरखेडे ग्राम पंचायत सदस्य, ग्रामस्थ ठोमरे, हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमुर्ती गाडगे बाबा यांचे प्रतिमेला तसेच डॉ. पंजाबराव देशमुख, तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला हारारपण व पूजन करून झाले. मान्यवरांच्या सत्कार नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी केले यात विद्यार्थी दशेत रासेयो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात कसे मौलाचे ठरते व हे शिबिर कसे शहर व गाव यातील समन्वय युवकाला कसे साधण्यात महत्वपूर्ण ठरते हे विषद केले तसेच मूल्यशिक्षण देण्यात रासेयो चे महत्व सांगितले. ग्राम आपोती चे सरपंच वैभव तराळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे गावात शब्दसुमनाने स्वागत केले व शिबिर दरम्यान सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. दामोदर कडू यांनी विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. कार्यक्रमाचे संचलन कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश जयस्वाल यांनी केले तर आभार डॉ. कविता हेडा यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गटप्रमुख सुमित वानखेडे , मृण्मयी बोबडे, गौरव मेटकर, आचल पालीवाल, मृणाल लवटे यांनी अथक परिश्रम घेतले.

**दिव्य मराठी विशेष** • नवमतदारांच्या शंकांचे केले निरसन; प्रशासन इलेक्शन मोडवर

# रासेयो शिबिरात 'ईव्हीएम' व 'व्हीव्हीपॅट'बाबत जनजागृती

प्रतिनिधी | अकोला

नवमतदारांना मतदानप्रक्रिया, तसेच 'ईव्हीएम' व व्होटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रेलबाबत (व्हीव्हीपॅट) माहिती मिळावी, यासाठी अकोला पूर्व मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयातर्फे आरएलटी महाविद्यालयाच्या सहकार्याने आपोती येथील कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर आयोजित आले.

मतदानप्रक्रिया, तसेच 'ईव्हीएम' व व्होटर व्हेरिफाईड पेपर ऑडिट ट्रेलबाबत (व्हीव्हीपॅट) नवमतदारांना माहिती मिळावी, यासाठी अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघात ठिकठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत. त्यानुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यक्रम घेण्यात आला. व्हीव्हीपॅट हे मतदान पेटीच्या शेजारी ठेवण्यात येत असलेले एक यंत्र आहे.

मतदान केल्यानंतर मत कोणाला केले आहे हे दाखविणारी चिठ्ठी यंत्राच्या खिडकीत येते आणि काही वेळाने परत जाते. दरम्यान आपोती येथील शिबिरात नवमतदारांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. शिबिरात विस्तार अधिकारी मनोज बोपटे, स्वाती माळवे, वंदना चौधरी यांनी मतदान यंत्रांबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही सहभाग होत प्रात्यक्षिक मतदानाचा अनुभव घेतला. विस्तार अधिकारी आनंद डिक्कर, प्रा. अरूण खेडकर, डॉ. शैलेश जयस्वाल, राष्ट्रीय सेवक संघ विभागाचे कार्यक्रम अधिकारी कविता हेडा, संजय गायकवाड, अरुण माळी आदी उपस्थित होते.

आरएलटी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ओम आवारे, सूरज ताथोड व नीतेश पराते यांनी परिश्रम घेतले.



जनजागृती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना माहिती देताना अधिकारी.

# रासेयो शिबिरातून 'ईव्हीएम' व 'व्हीव्हीपॅट' बाबत जनजागृती



अकोला : नवमतदारांना 'ईव्हीएम' व 'व्हीव्हीपॅट'बाबत माहिती मिळावी व जनजागृतीसाठी अकोला पूर्व मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयातर्फे आरएलटी महाविद्यालयाच्या सहकार्याने आपोती येथील कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर महाविद्यालयात गुरूवारी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर घेण्यात आले.

यावेळी विस्तार अधिकारी मनोज बोपटे, स्वाती माळवे, वंदना चौधरी यांनी मतदान यंत्रांबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही सहभागी होत प्रात्यक्षिक मतदानाचा अनुभव घेतला. विस्तार अधिकारी आनंद डिक्कर, प्रा. अरूण खेडकर, डॉ. शैलेश जयस्वाल, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी कविता हेडा, संजय गायकवाड, अरुण माळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ओम आवारे, सूरज ताथोड व नीतेश पराते यांनी परिश्रम घेतले.

# 'ईव्हीएम', 'व्हीव्हीपॅट'बाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

अकोला : नवमतदारांना 'ईव्हीएम' व 'व्हीव्हीपॅट'बाबत माहिती मिळावी व जनजागृतीसाठी अकोला पूर्व मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयातर्फे आरएलटी महाविद्यालयाच्या सहकार्याने आपोती येथील कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर महाविद्यालयात गुरूवारी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर घेण्यात आले.

यावेळी विस्तार अधिकारी मनोज बोपटे, स्वाती माळवे, वंदना चौधरी यांनी मतदान यंत्राबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही सहभागी होत प्रात्यक्षिक मतदानाचा अनुभव घेतला. विस्तार अधिकारी आनंद डिक्कर, प्रा. अरूण खेडकर, डॉ. शैलेश जयस्वाल, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी कविता हेडा, संजय गायकवाड, अरूण माळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ओम आवारे, सूरज ताथोड व नीतेश पराते यांनी परिश्रम घेतले.

देशोन्नती

# आरएलटी विज्ञान महाविद्यालयाचे रासेयो शिबिर !

## ग्राम आपोती येथे निवासी शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ■ स्थानिक आरएलटी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष निवासी शिबीर १३ ते २० जानेवारी या कालावीत दत्तक ग्राम आपोती बुद्रुक येथे संपन्न झाले. या शिबीरात १०० शिबीरार्थ्यांनी सहभाग घेतला.

या शिबीराचे नियोजन आरएलटीचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांचे मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश जयस्वाल, डॉ. कविता हेडा यांच्या नेतृत्वात गट प्रमुख-विद्यार्थी प्रतिनिधी सुमित वानखडे, मृण्मयी बोबडे व अन्य स्वयंसेवक यांच्या सहकार्याने संपन्न झाले. विशेष निवासी शिबीराचे उद्‌घाटन सोहळा प्राचार्य डॉ. नानोटी यांच्या अध्यक्षतेखाली,दामोदर कडू, सरपंच वैभव तराळे, उपसरपंच राहुल सिरसाट, पोलीस पाटील, डॉ.सुधिर कोहचाळे इतर ग्रामपंचायत सदस्य, आजबाजच्या गावातील सरपंच अणि उपसरपंच यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या शिबीरात 'व्यक्तिमत्व विकास' वर डॉ. विवेक हिवरे तर डॉ. अजय उपाध्याय यांनी 'विद्यार्थी जीवन जगण्याची कला' तर 'अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक द्रुष्टीकोन' या कार्यशाळे अंतर्गत सामाजिक कार्यक्रमात डॉ. स्वप्ना लांडे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजक डॉ.समाधान मुंडे होते. यावेळी आग नियंत्रणावर लेफ्टनन्ट डॉ. रोहित अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. कौशल्य योजना व उद्योजकता या विषयावर डीआयसी प्रकल्प अधिकारी प्रसन्न रत्नपारखी,मधू कोठारी यांनी मार्गदर्शन केले.

महिला मेळाव्यात कौशल्य विकास कार्यशाळा प्रा. डॉ. पूनम अग्रवाल, डॉ. अर्चना सावरकर, प्रा. वैशाली बडगजर, डॉ.सजाता ताडम, डॉ.कविता हेडा, डॉ.अंजली सांगोळे, डॉ.रश्मी जोशी सावलकर, प्रा. सोनाली गवांदे यांच्या नेतृत्वात घेण्यात आले. या कार्यशाळेत हर्बल उत्पादन या विषयावर मार्गदर्शन डॉ.पुनम अग्रवाल यांनी केले. प्रा.डॉ.महेश डाबरे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य या बाबत माहिती दिली. सायबर सुरक्षा या वर प्रा. राम घायाळकर यांनी मार्गदर्शन केले.

बीजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड.मोतीसिंह मोहता यांचे मार्गदर्शनाखाली कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी गोयनका विधी महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन एगांवकर व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. मतदान जनजागृती कार्यशाळा बाबासाहेब आपोतीकर महाविद्यालयात नवमतदारांकरिता घेण्यात आली.

मनोज बोपटे यांच्या मार्गदर्शनात प्रा. अरुण खेडकर यांच्या समन्वयाने 'इव्हीएम' प्रात्याक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. प्रा.शैलेन्द्र मडावी, प्रा. शंकेश झायटे यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे धडे गावकऱ्यांना दिले. रासेयो क्षेत्रिय समन्वयक प्रा.डॉ.सुधिर कोहचाळे यांनी आयुष्याची टाळेबंदी या विषयावर मार्गदर्शन केले. दररोज सायंकाळी गावातील लहान मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावे यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन डॉ. कविता हेडा यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. या शिबीराचा समारोप आरएलटीचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या अध्यक्षतेखाली शांताराम बुटे, करुणा बुटे, प्रा. राम चव्हाण, डॉ.सुधिर कोहचाळे, सरपंच वैभव तराळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी आपोतीचे सरपंच वैभव तराळे, उपसरपंच राहुल सिरसाट, पोलिस पाटील मिलिंद मोहोड, ग्राम पंचायत सदस्य यांची वेळावेळी उपस्थिती लाभली.

या शिबीराच्या यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश जयस्वाल, डॉ. कविता हेडा यांच्या नेतृत्वात गट प्रमुख-विद्यार्थी प्रतिनिधी सुमित वानखडे, मृण्मयी बोबडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी विष्णु कांगटे, राजेश दंडनाईक, दिपक घोंगे, दिलीप नगरकर, सतिष शिरसाट, विनोद चिकटे व अन्य स्वयंसेवक मोक्षदा सावरकर, पल्लवी दाळू , पल्लवी दामोदर, शुभांगी मारब्दे , साक्षी सरोदे, संजना कातोरे, गौरव मेटकर, अभय राठोड, प्रशिक सिरसाट, जितेश निशांतराव, आदित्य सिरसाट, प्रथमेश ढाकरे आदींनी परिश्रम घेतले.

### सकाळच्या सत्रात प्रार्थना, प्रभात फेरी,श्रमदान!

या शिबीरात दररोज सकाळच्या सत्रामध्ये प्रार्थना, स्वच्छता प्रभातफेरी, वृक्षारोपण, श्रमदान घेण्यात आले. यामध्ये शिबीरार्थीनी लोणार नदीवर वनराई बंधारा बांधला. तसेच गावातील बसस्टॅन्ड परिसरात वृक्षारोपण केले. शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. राजेश चंद्रवंशी यांनी व्यायामाचे महत्व सकाळच्या सत्रात स्वयंसेवकांना पटवून दिले.



## ग्रामस्वच्छतेसोबतच ग्रामस्थांनाही केले मार्गदर्शन

# रासेयोचे विशेष शिबीर ग्रामआपोती बुद्रुक येथे संपन्न



।अकोला, दि. २५।

स्थानिक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष निवासी शिबीर नुकतेच १९ जानेवारी ते २५ जानेवारी २०२४ या दरम्यान दत्तक ग्राम आपोती बुद्रुक येथे संपन्न झाले. या शिबीराचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांचे मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शैलेश अग्रवाल, डॉ. कविता हेडा यांच्या नेतृत्वात गट प्रमुख-विद्यार्थी प्रतिनिधी [illegible], मृण्मयी बोबडे व अन्य स्वयंसेवक यांच्या सहकार्याने संपन्न झाले. या शिबीरात १०० शिबीरार्थ्यांनी सहभाग घेतला. विशेष निवासी शिबीराचे उद्घाटन सोहळा दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी मा. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांच्या अध्यक्षतेखाली, क.शि.प्र. संस्थेचे उपाध्यक्ष दामोदरजी कढू, गावातील सरपंच श्री वैभव तळे, उपसरपंच राहुल शिरसाट, पोलीस पाटील, डॉ.सुधिर कोहचाळे, ग्रामपंचायत सदस्य, आजूबाजूच्या गावातील सरपंच आणि उपसरपंच यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या शिबीरात दररोज सकाळच्या सत्रामध्ये प्रार्थना, स्वच्छता प्रभातफेरी, वृक्षारोपण, श्रमदान घेण्यात आले. या मध्ये शिबीरार्थींनी लोणार या नदीवर वनराई बंधारा बांधला. तसेच गावातील बस स्टॅन्ड जवळ वृक्षारोपण केले. शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. राजेश चंद्रवंशी यांनी व्यायामाचे महत्व सकाळच्या सत्रात स्वयंसेवकांना पटवून दिले.

दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये रा. से. यो. व व्यक्तिमत्व विकास या वर डॉ. विवेक हिवरे यांनी प्रकाश टाकला. डॉ. अजय उपाध्याय यांनी विद्यार्थी जीवन जगण्याची कला यावर परिचय दिला. अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टीकोन या कार्यशाळे अंतर्गत सामाजिक कार्यक्रमात डॉ. स्वप्ना लांडे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजक डॉ.समाधान मुंडे होते. सदर कार्यक्रमास गावकरी मंडळींचा भरपूर प्रतिसाद मिळाला. आरोग्य योजना याबाबत ले. डॉ. रोहित अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. कौशल्य योजना व उद्योजकता या विषयावर श्री प्रसन्नजी रत्नपारखी, प्रकल्प अधिकारी, डी. आई. सी. ऑफिस अकोला व मा. मधू कोठारी यांनी मार्गदर्शन केले. महिला मेळाव्या अंतर्गत कौशल्य विकास कार्यशाळा प्रा. डॉ. पूनम अग्रवाल, डॉ. अर्चना सावरकर, प्रा. वैशाली बढगुजर, डॉ. सुजाता तायडे, डॉ.कविता हेडा, डॉ.अंजली सांगोळे, डॉ.रश्मी जोशी सावळकर, प्रा. सोनाली गवांदे यांच्या नेतृत्वात घेण्यात आले. या कार्यशाळेत हर्बल उत्पादन या विषयावर मार्गदर्शन डॉ.पुनम अग्रवाल यांनी केले. प्रा.डॉ.महेश डाबरे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य या बाबत माहिती दिली. सायबर सुरक्षा या वर प्रा. राम घायाळकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच दि बोर्डी संस्थेचे अध्यक्ष ॲड.मोतीसिंह मोहता यांचे मार्गदर्शनाखाली कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमात श्री नचमन गोयनका विधी महाविद्यालय येथिल प्राचार्य गजानन एणावकर व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. दिनांक २८ जानेवारी रोजी मतदान जनजागृती कार्यशाळा बाबासाहेब आपोतीकर महाविद्यालयात नवमतदारांकरिता घेण्यात आली. श्री मनोज बोपटे यांच्या मार्गदर्शनात व प्रा. अरुण खेडकर यांच्या समन्वयाने ई.व्ही.एम मशीन चे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. महाविद्यालयाती सूक्ष्मजीवशास्त्र विभागाकडून शालेय व गावकरी मुलांची रक्तगट तपासणी करण्यात आली. तसेच समाज माध्यमे, समाज व आजचा युवक या विषयावर प्रा. डॉ. हरीश मालपाणी यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षा मार्फत प्रा.शैलेन्द्र मडावी, प्रा. संकेत झापटे यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे धडे बालकल्यांना दिले. रासेयो क्षेत्रिय समन्वयक प्रा.डॉ.सुधिर कोहचाळे यांनी आयुष्याची टाळेबंदी या विषयावर मार्गदर्शन केले.

दररोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये लोक जागरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच गावातील लहान मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या करिता विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन डॉ. कविता हेडा यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.